RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६४(३)] शुक्रवार, ऑगस्ट ७, २०२६/श्रावण १६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ९७

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांजकडून

विशेष कार्यकारी अधिकारी पदी नेमणूक

वाचले.—

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२५.

२. शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. विकाअ-११२५/प्र.क्र.०५/का-५, दिनांक ११.०२.२०२५.

३. महानगरपालिका सचिव कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. म. स./१२३६१/मनपा, दिनांक २५ मार्च २०२६.

अधिसूचना

क्रमांक एमएजी/टे-२/विकाअ/२०२६.—उपोद्घातातील शासन निर्णय १ व २ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, आंचल गोयल, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर जिल्हा खालील नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महानगरपालिका सचिव कार्यालयाकडून उपोद्घातातील क्र.३ अन्वये शिफारस प्राप्त झालेल्या एकूण नगरसेवकांपैकी एकूण ०२ नगरसेवक यांस मुंबई शहर जिल्ह्याचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः आदेश निर्गमित केल्यापासून ५ वर्षांकरिता किंवा नगरसेवक पदाचा कार्यकाळ संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील.

२. विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास समक्ष राहतील :—

१. नागरिकांना शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळख आणि रहिवासाचे प्रमाणपत्र देणे.
२. दुष्काळ, पूर, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी शोध व बचाव पथकाला मदत करणे आणि नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करणे.
३. शहरात चोरी, शांततेचा भंग किंवा सण-उत्सवाच्या काळात अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस विभागाला मदत करणे.
४. महत्त्वाच्या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान आवश्यक असलेल्या विविध पंचनाम्यांमध्ये 'पंच' म्हणून काम करणे.
५. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सहकार्य करणे.

६. मतदार यादी अद्ययावत करणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची माहिती देणे यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (BLO) मदत करणे.

७. महा ई-सेवा केंद्र किंवा आधार केंद्रावर विविध कागदपत्रांसाठी येणाऱ्या नागरिकांना मार्गदर्शन व सहकार्य करणे.

८. हुंडाबळी, बालविवाह, व्यसनाधीनता, बालमजुरी आणि वेठबिगारी यांसारख्या अनिष्ट प्रथांविरुद्ध शासनास मदत करणे.

९. शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण, कृषी आणि पशुसंवर्धन या विषयांवर जनजागृती करणे आणि सर्वेक्षणात मदत करणे.

१०. महिला, मुले आणि वृद्धांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक नियमनासाठी प्रशासनाला सहकार्य करणे.

११. ग्रामसभा, दक्षता समिती आणि राष्ट्रीय सण-उत्सवांमध्ये 'विशेष निमंत्रित सदस्य' म्हणून उपस्थित राहता येईल.

१२. तालुका स्तरावरील शासकीय कार्यालयांमध्ये कामासाठी गेल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीसाठी प्राधान्य मिळेल.

१३. आपल्या घरावर किंवा कार्यालयावर 'विशेष कार्यकारी अधिकारी' असा फलक लावता येईल (मात्र वाहनावर लावण्यास सक्त मनाई आहे).

१४. हे पद पूर्णतः "**मानसेवी**" स्वरुपाचे असून यासाठी कोणतेही वेतन किंवा भत्ते दिले जाणार नाहीत.

१५. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक अधिकाऱ्याला एक अद्वितीय (Unique) नोंदणी क्रमांक दिला जाईल, जो त्यांच्या ओळखपत्रावर आणि शिक्क्यावर असणे अनिवार्य आहे.

१६. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे तात्काळ परत करण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची राहील. अन्यथा अशी व्यक्ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याचे विरुद्ध नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

१७. वाचले क्र.१ मधील परिच्छेद क्र.४.४ व ४.५ ला अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी पोलीस पडताळणी अहवाल नकारात्मक प्राप्त झाल्यास संबंधीतांची नियुक्ती जिल्हाधिकारी मार्फत तात्काळ रद्द करण्यात येईल.

अनुसूची

अ. क्र.	जिल्हा क्र.	वर्ष	आधार क्रमांक	नगरसेवक यांचे नाव	स्थायी पत्ता
१	२४	२०२६	६५९६ १८३८ ९०१९	साईनाथ शिवाजी दुर्गे	रुम नं-६,२रा मजला,संकेत को.हौ. सो.लि. भवानी शंकर रोड,दादर, मुंबई ४०० ०२८.
२	२४	२०२६	८४०३ २२७८ ७७४९	ज्ञानराज यशवंत निकम	बी/२०,ज्योती सदन,शितलादेवी मंदीर रोड, माहीम,मुंबई ४०० ०१६.

जिल्हा : मुंबई शहर,

दिनांक : ७ ऑगस्ट २०२६.

आंचल गोयल,
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
मुंबई शहर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.